# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्रमांक:१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४-१५/२३

दिनांक : 8 JUN 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/

अमरावती/नागपूर.

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत . . .
( सर्व प्रवर्गातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे).

खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थामधील ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क हे "शिक्षण शुल्क समितीद्वारे" ठरविण्यांत येते अशा संस्थामधील केन्द्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील (ओबीसी) तसेच यापूर्वी अर्ज भरु न शकलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना (एन.एफ.आर. संस्थेतील विद्यार्थ्यासहीत) शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर दिनांक ०८ जून २०१५ ते दिनाक ३० जून २०१५ पर्यंत अर्ज भरण्यासाठी लिंक देण्यात येत आहे. (शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून)

सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक ३० जून २०१५ पर्यंत संगणकीय प्रणालीवर भरलेल्या अर्जाची प्रत प्रमाणित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह (विद्यार्थ्यांनी यापूर्वी कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचे लाभ घेतले नाही असे स्वयं घोषणापत्र सादर करणे अनिवार्य राहील तसेच इतर योजनेमधून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासन जमा करण्यासंबंधीसुध्दा घोषणापत्रामध्ये नमूद करावे.) संबंधीत सस्थेनी विद्यार्थ्याचे ऑनलाईन अर्ज छाननी करुन अर्ज दिनांक १० जुलै २०१५ पर्यंत

सबंधीत विभागीय कार्यालयास सादर करावेत. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी प्राप्त अर्जांची छाननी करुन अहवाल या कार्यालयास दि. १५ जुलै २०१५ पर्यंत सादर करावा.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:- १ प्रणाली विश्लेषण तथा समन्वयक तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहिती व पुढील कार्यवाही करीता.

२. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माहिती करीता.

---

क्रमांकः-विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/ १३३५
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक १०/६/२०१५

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**१) प्राचार्य, सर्व पदविका/पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.